म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५२०



REFBK-0024451
REFBK-0024451

# चिन्मयी

बा. भ. बोरकर

संदर्भ काव्य
२५२०

दा. क. २८.४.५१
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२५४०
२४४५१
२०१७२०८

REFBK-0024451
REFBK-0024451

सुरेश एजेन्सी



# चिन्मयी

बा. भ. बोरकर





प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© श्रीमती रुक्मिणीबाई बोरकर
पर्वरी–आल्तु, बार्देश–गोवा

मुखपृष्ठ व आतील चित्रे
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
३० नोव्हेंबर १९८४

मुद्रक
चिं. स. लाटकर
४६१/४ सदाशिव पेठ,
'शिव-पार्वती', टिळक रोड
पुणे ४११०३०

किंमत वीस रुपये

**सुरेश एजन्सी**





विस्तवी येऊन जन्मा
चांदण्याचे फूल झालो
फाकुनी हृद्‌गंध आता
आलिया पंथे निघालो





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## ' चिन्मयी 'च्या निमित्ताने ....

' चिन्मयी ' हा कविवर्य बा. भ. बोरकर यांचा नवीन काव्यसंग्रह.
त्यांच्या पंचाहत्ताराव्या जन्म-दिवशी त्यांचा हा काव्यसंग्रह
आम्ही प्रकाशित करीत आहोत.
तीस नोव्हेंबर हा बोरकरांचा जन्म-दिवस.
त्यांच्या या वर्षीच्या जन्म-दिवशी साहित्यिकांच्या, रसिकांच्या आणि
बोरकर मित्रपरिवाराच्या उपस्थितीत या थोर कविवर्याच्या
आजवरच्या साहित्यसेवेचा यथोचित गौरव करावा;
' चिन्मयी ' आणि त्यांचे इतर साहित्य प्रकाशित करावे;
त्यांचा भव्य सत्कार करावा; असे आम्ही मनाशी योजिले होते.
परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते.
त्याप्रमाणे ते घडले...अकल्पित आणि तितकेच विपरीत !
आमची योजना अपुरीच राहिली...
कविवर्य बोरकर ' चिन्मयी 'साठी आपल्या आणखी काही कविता
देणार होते...थोडे थांबा असे ते वारंवार सांगत होते.
आम्ही थांबायला तयारही होतो.
पण ते मात्र शांत मनाने आपल्यातून अचानक निघूनच गेले !
ज्या कविता ते देणार होते त्या न देताच ते निघून गेले.

त्यामुळे हाती आलेल्या कविता प्रसाद म्हणून स्वीकारूनच
हा काव्यसंग्रह आम्ही सिद्ध केला.
' चिन्मयी 'चे प्रकाशन मनाच्या काहीशा संमिश्र अवस्थेत
आम्ही करीत आहोत.
... ' चिन्मयी ' हा काव्यसंग्रह चांगल्या स्वरूपात प्रकाशित व्हावा
यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न आम्ही आमच्या
परीने केले आहेत.
बोरकर यांच्या नजरेखालून, हे सगळे काम गेले असते तर
हा काव्यसंग्रह अधिक चांगल्या स्वरूपात
आपल्या हाती आला असता.
तरीही आहे या स्वरूपातदेखील रसिकजन ' चिन्मयी 'चे
प्रेमाने स्वागत करतील याची आम्हास खात्री आहे.
' चिन्मयी ' सिद्ध करण्याच्या कामी आम्हास अनेकांचे साह्य लाभले.
चंद्रनाथ बोरकर यांनी आणि आप्पासाहेब वज्रम, श्रीराम कामत या
बोरकरांच्या उभय जामातांनी आम्हाला सर्वतोपरी सहकार्य दिले.
सुप्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट आणि नामांकित मुद्रक
अण्णासाहेब लाटकर यांनी तर ' चिन्मयी 'चे काम हे आपलेच काम
ही भावना राखून सर्व कामे केली.
थोर मनाच्या या सज्जनांचे आभार जितके मानावेत
तितके कमीच आहेत.
आम्ही या सर्वांचे ऋणी आहोत.

तीस नोव्हेंबर
एकोणीसशे चौऱ्याऐंशी

प्रकाशक

मी सकाळच्या उन्हांत
फुलरंग विखरतों
अन दुपारच्या वन्हांत
सावलींत पेरतों
सांजवेळच्या लटीं
समुद्रनृत्य पाहतों
मध्यरात्र होइतोंहि
चांदण्यात नाहतों
वाहतों उषाधुनीं
अनादिनाद लाहतों
संतसंगतींत मी
विमुक्तमीच राहतो
प्रांत लोपली लिपी
मी अक्षरां विसावतों
मी मनांत विस्मरुनी
अंतरीं रसावतों

[signature]

पर्वती · अपारते. ११-३-६४

## अनुक्रम


श्री क्षेत्र औदुंबर १
तुझा घाव ४
माझ्या व्याकुळल्या मना ५
जळातही कमळण का ही लागे जळू ! ६
पाणीच पाणी ७
मेघदूत ८
वनवेडा ११
ओळखता उजेडाला १२
उन्हे सोनियाची आली १३
चांदणे झाले उन्हाचे १४
ओटी होता चंद्र तेव्हा १५
सूर १६
उर्वशी १७
भेटले माहेर १८
पांडुरंग १९
सांगता २०
विठ्ठलाचे लग्न २१
नाते २२
जिणे गंगौघाचे पाणी २३
अंगी अवसर तोवरी ईश्वर २४
अभंग तो जाणा २५
माझी येथेच पंढरी २६
अद्वितीयपण २७
लोलक २८
ज्ञानदेवी माझी २९
श्री दत्ता ! ३०
न करी पस्तावा ३१

गोड झाले पारणे ३२
तू उषा होऊन ये ३३
आठवा जिवी रघुराणा ३४
सांज ३५
ज्योत जो सारून झाडी ३६
या पुढे थांबू नको तू ३७
नको रागेजू साजणी ३८
हेही नसे थोडे आयुष्यान्ती ३९
एकट्या माझ्याचसाठी ४०
विझवून दीप सारे ४१
निळे पाखरू ४२
ये ये मज घे कवेत ४३
विस्मरेन जीवनात मी तुला कसा ? ४४
पुन्हा पहाट होउ दे ४५
उदासी ४६
एकला असून मी ४७
ओढ ४८
धटिंगण ४९
गेल्या तीस वर्षांत ५०
देव नाही दूर ५२
तुझे मन ५३
कशी आलीस घेऊन ५४
आशीर्वाद ५५
नको आणूस आरशी ५६
डाळिंबीची दोन फुले ५७
सकाळच्या उन्हात ५८
गीत तुझे गाता गाता ५९
तमःस्तोत्र ६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५२०
दा. क्र. २२३४५-९
२०।९२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

श्री क्षेत्र औदुंबर

अक्षरांमाजि मंत्राक्षर ।
तैसे क्षेत्री औदुंबर ।
जेथे साक्षात श्री ओंकार ।
दत्तगुरू ॥ १ ॥
तो म्या घरीचिया देव्हारी ।
देखिला, रेखिला अभ्यंतरी ।
बाळपणीच भजनी गजरी ।
मनोभावे आठविला ॥ २ ॥
त्याते आळविता ऐसा ।
सगुणत्वे भावला मानसा ।
जेणे जाहलो अतिरसा ।
पाहणा मी ॥ ३ ॥
ओंकाराची लाभली दीक्षा ।
शब्दचि जाहला प्रबुद्ध शिक्षा ।
ठायीच झालो संसारवृक्षा ।
प्रदक्षणा ॥ ४ ॥

जीवनाच्या प्रतिसोपानी ।
गुरुरूपे हाता धरूनि ।
मज श्री क्षेत्र अनुशासुनी ।
सांभाळिले ॥ ५ ॥
तेथेचि एकदा सुधांशु-अक्षरी ।
निमंत्रिले मज श्रीनिवास करी ।
संक्रातीच्या साहित्य अवसरी ।
यावे घरा ॥ ६ ॥
दिनु होता अमृते पाहला ।
औदुंबरे होती कांचनकळा ।
तेव्हा त्याच्या छायेतला ।
ध्यानस्थ झालो ॥ ७ ॥
तेधवा संकल्प उगवला चित्ती ।
परमम्मंगल येचि क्षिती ।
वाचावी सिद्धसरस्वती ।
श्री ज्ञानदेवी ॥ ८ ॥
तोचि मानूनी प्रमाण ।
सोमवारी धातले आसन ।
जेथे शंकरानंद नारायण ।
आशीर्वचले ॥ ९ ॥
पुण्यपावन इये मठी ।
शांती ध्यानस्थ अतिगोमटी ।
समोर सृष्टी हरित पोपटी ।
पाचु-प्रभा ॥ १० ॥
येथे कृष्णा चंद्रभागा ।
काठी उभा अवधूत जागा ।
अपार जाहल्या अनुरागा ।
वैराग्य आले ॥ ११ ॥
येथे सूर्योदय अति देखणा ।
चैतन्याचा कुशल शिंपणा ।

वट अश्वत्थी ऋषिवर खुणा ।
करी जाग्या ॥ १२ ॥
आंगठ्याएवढी पाखरे ।
गाती येथे गंधर्व स्वरे ।
कोकीळ तो डहूळी गहिरे ।
अंतरीचे ॥ १३ ॥
ऐशिया सुंदर आसमंती ।
उमाळे सर्व हृदयश्रीमंती ।
ओवीसवे गाऊ लागती ।
रोमांच सारे ॥ १४ ॥
या स्थानाचा लौकिक थोरू ।
प्राकृताहि लाभे वरू ।
भरोनि जाय जिव्हारू ।
अमृतेसी ॥ १५ ॥
बैसे तेथेचि कल्पतरू ।
वास ये तो चंदन अगरू ।
प्यावे ते ते श्रीतीर्थ रुचिरू ।
तृप्तिदिणे ॥ १६ ॥
न कळता जे घडले भले ।
ते सर्व आज मोहरा आले ।
श्री गुरुच्या कृपाबळे ।
देहेचि मोक्ष ॥ १७ ॥
अध्याय मिटता अठरावा ।
सर्व तृष्णांचा निरास व्हावा ।
डोळे मिटता आतला दिवा ।
दिसावा मज ॥ १८ ॥

औदुंबर, १९.४.७९

## तुझा घाव

तुझ्या घावानेहि उठे दिव्य स्फुलिंग दीप्तीचा
व्यथेच्याहि तळातून वाहे प्रवाह शक्तीचा

माथा ठेविता डोंगर देसी गिरिधर भुजा
वृथा शिणू कण्हू का मी तुला कृपेस ना तुझ्या

दुःखातही वारिसी तू दुजे त्याहुनी दारुण
कशाला मी मापू तुला माझ्या तोकड्या सुतानं ?

ज्वाळांतही जाणतो मी तुझे कारुण्य अनंत
तुझ्या घावानेही आहे आज प्रसादे श्रीमंत

पर्वरी - आल्त, ३१.१.८१

## माझ्या व्याकुळल्या मना

माझ्या व्याकुळल्या मना ! नको साकळून राहू
सख्या आपुल्या गतीने तू मी निरंतर वाहू

नित्य चांगले स्मरावे ओखटे ते विसरावे
अहंतेचे द्वाडपण नीट ओळखून घ्यावे

आपुली ही पायपीट येथे थोड्या दिवसांची
वाट पहाते पहाट सोसलेल्या अवसांची

साकळलेपणामुळे विष प्रसवते जिणे
तेच प्रवाहता पण सुखे उसविते गाणे

गड्या माझ्या वाहू गाऊ रूप आकाशाचे ध्याऊ
पोळलेल्या धरे थोडी ओल देऊनिया जाऊ

पर्वरी - आल्त, २२.२.८१

## जळातही कमळण का ही लागे जळू ?

जळातही कमळण कां ही लागे जळू ?
ओसाडीत कसा असा गात राहे वेळू ?
पिकून गळता कशी फणसाची पाने
परतीच्या पाखरांचे झेलितात गाणे ?
नसून पाण्याचा कुठे काही मागमूस
रसे धाला कसा इथे डोलतो हा ऊस ?
धंटारवासवे का हा केवडा उसासे ?
काळोखात कासावीस का मी त्याच्या वासे ?
काळोख का नाचे असा फाकून पिसारा ?
त्याच्या लक्ष नेत्रे का या माझ्या नेत्री धारा ?

पुणे, २१.३.८१

## पाणीच पाणी

तृप्त पाणी तुष्ट पाणी कोंडलेले रुष्ट पाणी
तांबडे नाल्यानद्यांचे वेगवेडे पुष्ट पाणी
बावडीचे खोल काळे पारदर्शी मग्न पाणी
कोकरूसे नाचणारे खेळणारे नग्न पाणी
उंच काळ्या फत्तरींचे पांढरे फेसाळ पाणी
सागराच्या मस्तकीचे आंधळे विक्राळ पाणी
पावलीं घोटाळणारे लाडके तांबूस पाणी
साळिच्या काट्याप्रमाणे टोचरे पाऊस पाणी
पाणियाच्या उत्सवी या मातले पाणीच पाणी
आज त्याच्या प्रत्ययाने मीहि पाणी मीहि पाणी

पणजी, २८.६.८१

## मेघदूत

कविकुलपति कालिदास !
निकट आज स्मरण तुझे
पढलो तव मेघदूत
बनुनि तुझे हृदय दुजे

यक्षी दिसलास तूच
कृशशरीर व्यथित-मना
दुर्दिनिंही वनि दिसला
उठुनि तुझा कुलिनपणा

प्रणयचिंतनेच काय
घडला तुजकडुनि गुन्हा ?
शापातहि निहित तुझ्या
उत्थापक विधिघटना !

सुजनांतच कटुक व्यथा
जागविते सहृदयता
सुकवींतच ती प्रकटे
होउनि रसपटु कविता

झरले आषाढ मेघ
कल्प किती आजवरी
हा तुझाच मेघ परी
सतत स्रवे अमृत-सरी

झालो मी त्यांत न्हात
शीतल शृंगारशुद्ध
अलकेपर्यंत फिरुन
संयत संस्कारसिद्ध

धालो किति मोहरलो
मेघासह भ्रमताना
तव अक्षर चित्रांतिल
प्रतिदृश्यी रमताना

या भुइचे वनवैभव
जलवैभव स्थलवैभव
सुम--नग--पशु--पक्ष्यांचे
आल्हादक रूपोत्सव

रमणींचे रातेविभ्रम
नृमणींचे यशविक्रम
रत्नोज्ज्वल विपिणींचा
श्रमशामक द्युतिसंगम

संध्यारति - समयीचे
सुंदर कालीश-धाम
उचित-राग उचित-वाद्य
भजन घोष सुखविराम

वैभव हे अनुभविता
आले किति भरुनि नयन
बनुनि मिना मनि नटले
संस्कृतिचे संजीवन

अलकापुरि खचित थोर
सतत चंद्रिका विभोर
निष्ठावति सखि तव परि
थकलेली चंद्रकोर

झालो जरि तिज बघून
उन्मन मी अन् उदास
वार्ता परि कळता तव
झाली मज चंद्रहास

मग मानससर फिरलो
तृष्णादिक विस्मरलो
आणिक विमनस्कपणे
हिमनगांत वावरलो

कनकारुण द्युतित मला
घडले शिवसतिदर्शन
झाले शिरि स्मरपतिचे
चिर मोक्षद वरवर्षण

तुजमुळेच मीहि आज
प्रणयकविकुलावतंस
तुजसमान राजयोगि
मानससर राजहंस

पर्वरी - आल्त, २०.७.८१

## वनवेडा

मी वनवेडा मी वनवेडा मला फुलांचा वेढा
भुलुनि राहिलो मी भवतीच्या रंगांमधिल उजेडा
रंगांतुन मी गंधांतुन मी जातो मधुर मरंदी
घुमता घुमता विरतो हरतो शब्दांच्या स्वरछंदी
हृदयांमधल्या अवघड गाठी ध्वनिवलयी उलगडती
कारंजी आनंदजळाची तळातुनी बागडती
स्वतातले उदयास्त पाहतो गोऱ्या काळ्या रात्री
गात्रांमधले लावण्योत्सव साठवितो हृत्पात्री
अष्टांगांनी पाझरता ते शिरतो सहज परत्री
तेथुन येता प्राणपवनसा वावरतो सर्वत्री

पर्वरी - आल्त, ३०.७.८१

## ओळखता उजेडाला

उजेडाला घालशिल किती काळोखाचे आळे
आणि करिशील किती चित्तागात्रांचे कोंडाळे

काढ कवाडाची कडी उंबऱ्यात पांडुरंग
नको म्हणू ऊन त्याला त्यात फाकला श्रीरंग

ओळखता उजेडाला जग तुझाच पसारा
आली रात्र नवरात्र आला दिवस दसरा

मग सुखा काय उणे ? जिणे नक्षत्रपालखी
काळोखींची निद्रासुद्धा तृप्त समाधीसारखी

पर्वरी - आल्त, २.८.८१

## उन्हे सोनियाची आली

फारा दिवसांनी आज
उन्हे सोनियाची आली
चिंब साळीची बालके
ऊब पिउनिया धाली

अंगी जरतारी आंगी
माथां शिरपेच ल्याली
पाणियाच्या वाक्या वाळे
पायी घेऊन नाचली

गेला वारा गंधांगुली
त्यांच्या गालांना लावून
मेघ सारून आकाशे
त्यांना घेतले चुंबून

त्यांना पाहून फुटले
हसू राजेश्री श्रावणा
लोणियाने बळावला
त्यांच्या ओठांतला दाणा

पर्वरी - आल्त, ६.८.८१

## चांदणे झाले उन्हाचे

शाश्वताचा मी किनारा शैशवी हिंडून आलो
तेथल्या आनंदमेघी मोकळा साष्टांग न्हालो

स्वर्ग तो येथेच आहे जाणिले तेव्हाच प्राणी
चांदणे झाले उन्हाचे यामिनी नक्षत्रखाणी

जाळशा आल्या झळा त्या गार झाल्या स्पर्शमात्रे
पोळणारी वाळवंटे जाहली पुण्योद - पात्रे

संकटांचा कोण केवा ? दुःख खोटे, दैन्य खोटे
मी तयांशी झुंजताना भोगिले ऐश्वर्य मोठे

मृत्युने जेव्हा लवादे तोडिले ओल्या जिवाचे
पाहिले मी अंकसे ते प्राक्तनाच्या नाटकाचे

विस्तवी येऊन जन्मा चांदण्याचे फूल झालो
फाकुनी हृद्‌गंध आता आलिया पंथे निघालो.

पर्वरी - आल्त १५.८.८१

ओटी होता चंद्र तेव्हा
केली हयगय;
आता टाचे पावलाला
चांदण्याची सय.

गळा होता तेव्हा गाणे
गायलेच नाही;
जाणलेला सूर आता
वळतच नाही.

डोळां होते स्वप्न तेव्हा
चितारिले नाही;
आता पाहू जाता तेच
आकारेना काही.

साजणाच्या हाका तेव्हा
घेतल्या न कानीं;
नाव आठवेना पण
डोळां जमे पाणी.

जीव वेडा आता असा
टाकितो उसासा;
दुःखात या तेवढाच
उरला दिलासा.

पर्वरी - आल्त, १६.८.८१

## सूर

वारा झोपलेला आहे
सूर्य कोपलेला आहे
पाय आखडले पाणी
ठेचा खात खात वाहे

पानगळीने ग्रासली
उभी जरत्कारु झाडे
सावळ्यांच्या कोळिष्टकी
काही घाटते साकडे

तोच पाखरू एकाकी
सूर भिर्कावून गेले
लाहीतही माझे मन
दोन क्षण झाले ओले

पर्वरी - आल्त, १६.८.८१

## उर्वशी

सखे साजणी सिंधुजळी तव अळित्याच्या पाऊलखुणा
तुझ्या निऱ्यांच्या कृष्णकिनारी नटवुनि गेल्या गिरिगगना
तुझ्या स्मिताचा पसरुनि पारा पारावारावर झिलई
पापणिच्या तव छायेसरशी वनराईवर मउ दुलई
उदवियल्या तव कचबंधाचा गंध झुले पवनावरणी
तव चरणींचे उडले घुंगुर झाले नभि नक्षत्रमणी
तुटलेली तव वेणी झाली कोर विधूची लवलवती
तिच्या द्युतीने कडेकपारी धवल पयाने पाझरती
सखे उर्वशी नाहि उमगले येउनि कधि गेलीस कशी
तुला पाहिल्याविना कशी ही आग भुगभुगे उरी अशी

पर्वरी - आल्त, २१.८.८१

## भेटले माहेर

विठ्ठल तो बाप माझा
आई रखुमाई
पुंडलीक भाऊ माझा
बहिण भिमाई

संत वैष्णवांचा मेळा
माझा गोतावळा
तेणे माझे जिणे झाले
अमृतसोहळा

संगी कीर्तनाच्या रंगी
ओलावला कंठ
पंढरीचे वाळवंट
ते माझे वैकुंठ

प्रकाश अपार झाला
अंतरी बाहेर
नाचता नाचता मला
भेटले माहेर

बोरी, ३.९.८१

## पांडुरंग

पांडुरंग दाता : पांडुरंग त्राता
अंतीचा नियंता पांडुरंग

दयेचा सागर : मायेचे आगर
आनंदाचे घर पांडुरंग

भक्तीचा ओलावा : दृष्टीचा दिष्टावा
श्रध्देचा विसावा पांडुरंग

तप्तांचे चंदन : दीप्तांचे इंधन
प्रकाशवर्धन पांडुरंग

अंगसंगे त्याच्या झालो मी निःसंग
देहीच साष्टांग पांडुरंग

पर्वरी - आल्त, ८.९.८१

## सांगता

विठ्ठल नाही पंढरीत, विठ्ठल आहे अंतर्हित
त्रिजगत आहे प्रेरित विठ्ठलू माझा

विठ्ठल आहे दाही दिशां, उगवी मिटी उषा निशा
विठ्ठल बिलोरी आरशासारखा आहे

विठ्ठलासारिखे नोहावे, त्याच्याकडेच झेपा
आपुले अरूप पहावे विठ्ठल बिंबी

विठ्ठल अरूपी गाठिता अवघ्या जन्मांची सार्थता
विठ्ठल निष्ठेची सांगता विठ्ठली भोगी

पर्वरी - आल्त, ८.९.८१

## विठ्ठलाचे लग्न

मथुरेला मज विठ्ठल गावला
संकेत फावला तुकोबाचा

स्थापिला देव्हारी पूजिला अर्चिला
तरी उदासला भासला तो

एकलीक त्याची सोसवेना झाली
निघाली जिव्हाळी काळजाची

जिवाला लागले रख्माईचे वेध
केला तिचा शोध तीन वर्षे

अकस्मात हाती आली हरिद्वारी
विठ्ठलाशेजारी उभी केली

हासला विठ्ठल रख्माई लाजली
माझी दिठी झाली अंतर्पाट

मनाच्या मुहूर्ती लावियेले लग्न
झाले माझे धन्य पौरोहित्य

पर्वरी - आल्त, ८.९.८१

## नाते

तुझे असंख्यात हात त्यातलेच माझे दोन
तुझे असंख्यात पाय त्यांतलेच माझे दोन

तुझे असंख्यात डोळे त्यांतलेच माझे दोन
तुझे असंख्यात ओठ त्यांतलेच माझे दोन

तुझ्या संकल्याप्रमाणे घडो त्यांची हालचाल
तुझ्या प्रातिभ दीप्तीने माझे उजळो कपाळ

माझ्या पिंडात स्पंदतो तुझा ब्रह्मांडाचा स्पंद
माझ्या प्राणातून वाहे तुझा आनंद निस्यंद

सूत्रचालका खेळतो जसा खेळविसी माते
कळा तुझी खुलवावी असे तुझे माझे नाते

पर्वरी - आल्त, १५.९.८१

## जिणे गंगौघाचे पाणी

नाही पुण्याची मोजणी
नाही पापाची टोचणी
जिणे गंगौघाचे पाणी

कशाचा ना लागभाग
कशाचा ना पाठलाग
आम्ही फुलांचे पराग

आम्हा नाही नामरूप
सदा आकाशस्वरूप
जसा निळा निळा धूप

पूजेतल्या पानाफुला
मृत्यु सर्वांग सोहळा
धन्य निर्माल्याची कळा

पर्वरी - आल्त, १६.९.८१

## अंगी अवसर तोवरी ईश्वर

अंगी अवसर तोवरी ईश्वर
एरवी मी नर वैगुण्यांचा

संचारी बोलतो तो जाणा विठ्ठल
अन्यवेळी बोल फोल माझे

स्पर्शे त्याच्या होतो प्रकाशपुतळा
एरवी ओवळा कावळा मी

जे न माझे त्याचा वाहू का मी गर्व
कर्तृत्व ते सर्व विठ्ठलाचे

पर्वरी - आल्त, २१.९.८१

## अभंग तो जाणा

अभंग तो जाणा छंदांमाजी राणा
ओवी ते चांगुणा राणी त्याची

प्रतिष्ठिला त्यांनी मराठी देव्हारा
गुह्याचा गाभारा उजळीला

श्लोक झाले खांब आर्या त्या तुळया
दिंड्या साक्या झाल्या पत्रवल्ली

लावणी भावीण पोवाडा पार्पती
ऐकतो श्रीपती ओवियेचा

राई गवळण भिमाई विराणी
कळसाला पाणी कांचनाचे

पर्वरी - आल्त, १.१०.८१

## माझी येथेच पंढरी

माझी येथेच पंढरी
विठू भेटे दारी घरी

येतो माणसासारखा
होतो पाठिराखा सखा
काही पडू न दे उणे
धावे प्रसंगाकारणे

घाली उन्हात सावली
वेढी थंडीत कांबळी
धरी छत्र पावसात
करी काळोखी सोबत

कधी लावितो कानस
माझा पारखितो कस
कधी घालतो विस्तवी
माझी वाढवी थोरवी

त्याच्यामुळे माझे जिणे
चोख सोन्याच्या प्रमाणे

पर्वरी - आल्त, २.१०.८१

## अद्वितीयपण

आंगठ्याची सही तशी जगी दुजी नाही
अद्वितीयपण आलो प्रत्येक घेऊन
स्वयंभू अमूप नवे विठ्ठलाचे रूप
तेच जीवेभावे आठां अंगी शृंगारावे

पर्वरी - आल्त, ३१.१०.८१

## लोलक

शारदेच्या झुंबराचे
शब्द अद्‌भुत लोलक
अंतःप्रकाशी डोलता
त्यांत आंदोळे त्रिलोक

स्नेहे खेळता त्यांच्याशी
चित्त त्यांच्यावर जडे
स्वर होउनिया जागा
तिळा आतला उघडे

पर्वरी - आल्त, ३०.११.८१

## ज्ञानदेवी माझी

ज्ञानदेवी माझी धुळाक्षर पाटी
तिची ओवी ओठी गोडावली

वाचता पोचलो अर्थाच्या पल्याड
आढळले झाड कैवल्याचे

तयाचिये छाये पावलो विसावा
उकलला गोवा चौऱ्यांशीचा

पहाटल्या दिठी ज्ञानराज–भेटी
प्रकाश–कोंदाटी सुखी झालो

पर्वरी - आल्त, १.१२.८१

श्री दत्ता !

श्री दत्ता ! तव पादुका स्थिर जिथे
तीर्थे तिथे वोळती
चारी वेद सुणे बनून जवळी
त्यांच्याच रेंगाळती
पृथ्वी होउनि कामधेनु कपिला
त्यांची द्रुती हुंगते
पुण्यक्षेत्र - शताब्दि - शिल्प - कृती ही
कीर्ती तुझी सांगते.

(साखळीच्या श्रीदत्त मंदिराच्या शताब्दि स्मारकासाठी लिहिलेला श्लोक)

पर्वरी - आल्त, ४.२.८२

## न करी पस्तावा

केलिया भल्याचा न करी पस्तावा
जरी घोर चावा कृतघ्नाचा
हाच खरा आहे कसोटीचा क्षण
निज साचपण पारखाया

भगवंते ज्याला दिधले जीवन
तो का तुझ्यावीण होता उणा ?
भक्त काय ठेवी हिशेबाची कीर्द
दंशे नोहे विद्ध कोणत्याही

सायन - मुंबई, १२.३.८२

## तू उषा होऊन ये

मी निशेने ग्रस्त होता तू उषा होऊन ये
कोर-शी प्राजक्त वेणी कुंतली खोवून ये
या जगाच्या यातनांनी दृष्टि माझी कुंठता
तू उद्याची स्वप्नसृष्टी लोचनी घेऊन ये
जायबंदी आर्ष मूल्ये पाहुनी मी खंगता
दीपसा आरक्त त्यांचा तू टिळा लावून ये
संशयाच्या वायसांनी टोचिता माझी धृती
क्षेम द्याया शाश्वताच्या चंदनी न्हाऊन ये
सूर माझा क्षीण होता, शब्द होता पारखे
पैंजणे श्रद्धाश्रुतींची तू पदी लेऊन ये.

पर्वरी - आल्त, ७.१०.८२

## गोड झाले पारणे

ना कधी दुःखात मी डोळ्यांत पाणी आणिले
भावले लावण्य त्यांचे तेच मी वाखाणिले

न्हाणिता जाळात ओल्या हाणिता घावी घणी
स्वर्णकाराचे तुझे कौशल्य मर्मी जाणिले

लाडका मी दागिना आता तुझ्या वक्षःस्थळी
तृप्त स्पर्शाने तुझ्या रे मी मला पालाणिले

सांगता आता व्यथांची : गोड झाले पारणे
तू मला तावून अंती चांदण्याने न्हाणिले.

पुणे, १.४.८२

## आठवा जिवी रघुराणा

हे जीवन सरते जाणा
आठवा जिवी रघुराणा

विस्तार दिसे जो सारा
त्याचाच सचित्र पसारा
हे अविरत ध्यानी आणा
आठवा जिवी रघुराणा

तो सूत्रकळाविद खेळे
म्हणुनीच जगत्रय हाले
त्यावीण गणा न प्रमाणा
आठवा जिवी रघुराणा

तो स्मरता हरते पाप
तो स्मरता सरती ताप
त्याच्याचमुळे सुख प्राणा
आठवा जिवी रघुराणा

घालिता तयावर भार
फुलहलका हा संसार
शीणाविण मिटती तृष्णा
आठवा जिवी रघुराणा

तो आठविता सुख दाटे
बोथटून जाती काटे
नित अतिरस येई उधाणा
आठवा उरी रघुराणा

पर्वरी - आल्त, ९.१.८३

## सांज

सांज मुसमुसून ओलसर लाल
काळ्या झाडीत विजेचे धूसर दिवे
पांगल्या जागी थबकलेले,
विस्मय—चकित
दूरातला दीपस्तंभ धाप लागलेला
मी बघतो सांजेच्या कानशिलांवर
चमकत्या दोन टिकल्यांचे गोंदवण
काळजाचा ठोका वाढतोच आहे
कशासाठी ? कशासाठी ?

सावल्या झाल्या पायउतार
झाडाझाडांत झिणझिण सतार
आठवणींना काळी किनार
कलाबतूने लिकलिकणारी.

पर्वरी - आल्त, ११.१.८३

## ज्योत जो सारून झाडी

ज्योत जो सारून झाडी काजळीचा काजवा
त्यास जोखायास आणू कोठला मी ताजवा ?

दर्शने ज्याच्या फुले ही अंतरी दीपावली
आणि गात्री पालवे वासंतवल्ली कोवळी

वाहते विश्रांत जीवी अमृताची निर्झरी
अन् तिच्या पाण्यात खेळे चंद्रम्याची माधुरी

संग त्याचा गंधवाही फुल्ल पद्मासारखा
जीव होतो तत्क्षणी तृष्णांक्षुधांना पारखा

ही प्रतीती लाभता का बोध त्याशी मागसी
मौन दाटे तोच शब्दांमागुती का लागसी ?

ज्ञान जे आकाशसे शब्दांत ते मावेल का ?
एक का आहे कुणी येथे दुज्याच्या सारखा ?

पर्वरी - आल्त, २५-२-८३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९२०
दा. क्र. २४४५७
का०६२५।७२८६
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

या पुढे थांबू नको तू

यापुढे थांबू नको तू आपुल्या वाटा निराळ्या
वाढत्या संध्येत माझ्या सावल्या वाटेत आल्या

चांदणे भोगून झाले सावल्यांची ओढ आता
मैफली गाऊन झाल्या मौन झाले गोड आता

लौकिकी रंगून जा तू और त्याला वर्ख आहे
लौकिका पल्याडच्या या अद्‌भुती मी गर्क आहे

पावसाचे शैत्य येथे काजव्यांची लख्ख झाडे
गर्द काळोखात सुद्धा चित्त चाकाटे उजेडे

जा कुठेही जा कशीही शेवटी येशील येथे
वाकडी वा वाट वेडी या इथे विश्राम घेते

पर्वरी - आल्त, २७.२.८३

## नको रागेजू साजणी

नको रागेजू साजणी
माझा स्वभावच असा
पाय फुटल्यापासून
मला हिंडण्याचा वसा

नाही उचलिले काही
जग पाहून हर्षलो
कुणी माणूस भेटता
मेघ होऊन वर्षलो

जिथे तिथे पीक पाणी
नाही सुखा काही उणे
वारे पिऊन बागडे
माझ्या मुखातले गाणे

लागे घरावर दिवा
ही तो तुझीच कमाई
आणि साखरपाणीशी
तुझी माझी दिलजमाई

पर्वरी - आल्त, २१.३.८३

## हेही नसे थोडे आयुष्यान्ती

माझिया अज्ञाना नाही अंतपार
व्यर्थ वय-भार वागविला
निद्रा भय किंवा आहार मैथुन
तद्‌गुज अजून नुमगले
आजन्म ज्या देहे केली मज साथ
तोही नाही नीट ओळखिला
कैसा तो जागवी यातनेचा दाह
उसवी प्रवाह अमृताचा
लागली न त्याची अजून चाहूल
अज्ञानाची भूल ऐसी माझ्या
त्यासी जो चाळवी गैबी सूत्रधारी
आकळला तरी नेणिला तो
कळे तरी माझे अज्ञान केवढे
हेही नसे थोडे आयुष्यान्ती

मुंबई दादर, ५.४.८३

## एकट्या माझ्याचसाठी

यापुढे हे गीत माझे एकट्या माझ्याचसाठी
राहिलेला सूर तोही एकट्या माझ्याचसाठी

भागली ही चंद्रभागा डोह डोले वाळवंटी
त्यात मी डुंबून घेतो एकट्या माझ्याचसाठी

मुक्त ही निष्पर्ण झाडे थांबली निःस्तब्ध काठी
त्यांत मी सामील आहे एकट्या माझ्याचसाठी

चांदण्याच्या अस्तकाळी मग्न आता भग्न घाटी
मी अभंगी दंग आहे एकट्या माझ्याचसाठी

ये तुक्याचा टाळ हाती बोल त्याचे माळ कंठी
सारखे ते डोल घेती एकट्या माझ्याचसाठी

पुणे, १०.५.८३

## विझवून दीप सारे

विझवून दीप सारे
मी चाललो निजाया
आता अशाश्वताची
उरली मुळी न माया

मी पाहिले तयाचे
वेल्हाळ रंग सारे
तेव्हाच शाश्वताचे
मी हेरिले इशारे

स्वर शब्द वेचलेले
शोषून सर्व प्राणी
आजन्म ओविली मी
त्यांची प्रसन्न गाणी

ध्वनि त्यांतुनी परंतू
कुणि आगळा निघाला
त्यांचाच छंद आता
या लागला जिवाला

खेळून सर्व नाती
उरलो पुन्हा निराळा
लंघून राहिलो मी
माझ्याहि संचिताला

मिळु द्या मला मुळाशी
सारी मिटून दारे
मोकाट वारियांनो!
थोडे मुकाट व्हारे

पर्वरी - आल्त, २६.७.८३

## निळे पाखरू

निळे निळे कुणी एक पाखरू सकाळच्या ग पारा
सुवर्ण घुंगुर बांधुन पायी आले माझ्या दारा

गीत पाखरू आले तैसे
झाडांझुडपां लागले पिसे
कोंब धुमारे फुटून माझे परसू आले बहरा

कंठ फुलांचे मधे दाटले
तृणांकुरांना डोळे फुटले
अमृतसुंदर सुचले अवचित गीत मनोरम भ्रमरा

जिवा पाखरू भिडून गेले
गाढ निळी मी तशीच झाले
दृष्टांताने मीही भेटले माझ्या राजकुमारा

१९८३

## ये ये मज घे कवेत

अंतरात ये कुठून हाक ही मला ?
येथला उठून जीव स्वैर पांगला

दिसति धवल गिरिशिखरे
रक्तनील कमलसरे
हरित वसन हसित वदन सृष्टि निस्तुला

मधुपानी भृंग दंग
सुमनसंगि सुमविहंग
घनि मृदंग सजल रंग वस्तु–वस्तुला

तरूतरूंत शततंत्री
रत स्थिरचर स्वरमंत्री
त्यातुनि चिर शब्दछंद मजसि लागला

हाकेने परि तुझिया
हाहि मोह जाय लया
ये ये मज घे कवेत अमित वत्सला

पर्वरी - आल्त, ३१.७.८३

## विस्मरेन जीवनात मी तुला कसा ?

विस्मरेन जीवनात मी तुला कसा ?
लोपतो कधी कधी मलाच मी असा

भेटलो अनेकदा नि खूप बोललो
आणि एकदा असेच मूक जाहलो

जाणतेस तेधवाच साच भेटलो
शब्द बोलल्याशिवाय सर्व बोललो

मांडिला प्रपंच तोहि याचसाठि ना ?
लोपुनीच लाभलो किती पुन्हा पुन्हा !

गोड त्यामुळेच आज आपुले जिणे
विस्मरे स्वतःस त्यास विश्वधार्जिणे

पर्वरी - आल्त, ३१.७.८३

## पुन्हा पहाट होउ दे

दिवा असाच राहू दे तुला निवांत पाहु दे
तपःश्रियत गे तुझ्या मला उदंड न्हाउ दे

व्यथा पिकून गे तुझ्या मुखी सुखे विसावल्या
कथा बनून कोवळ्या रसावुनी मुसावल्या

ऋतू सहाहि ढाळिती किती नव्या नव्या कळा
जरेत आगळ्या तुझ्या अपूर्व गंध सोहळा !

कधी कधी मनास ये उदास एकटेपणा
चराचरीही जाणवे जुनाट तोच तो पणा

चुकून ये कुणीतरी मुलेंहि दूर पांगली
दुरावलीत माणसे जरी मुळात चांगली

असह्य एकटेपणी तुझीच ओढ लागते
पुनश्च मर्गळीतहि प्रसन्न ज्योत जागते

तुझीच साथ राहिली भरून जीव लाहु दे
सरून रात्र जाउ दे पुन्हा पहाट होउ दे

पर्वरी - आल्त, २८.८.८३

## उदासी

पाण्यावरी जेवि तवंग येतो
तैशीच चित्तास जडे उदासी
झाडावया ती मज वाटते की
हे लोक वेडे बुडती विलासी

त्यांना कळेना अपुली उदासी
ही हाक आहे सृजनेश्वराची
ध्यासे तिचा काढित माग जावे
ही मोक्षदात्री नियती नराची

मानू नको शाप तिला मनारे
अंती ठरे तीच वरप्रणाली
तू लाविता प्राण तुझा पणाला
होईल ती ज्योत तुझ्या कपाळी

सिंधूचिया बाष्पबळे घनाला
तैसाच हा जन्म तुला मिळाला
त्याच्यापरी हर्षत वर्षता तू
जाशील सानंद तुझ्या मुळाला

पर्वरी - आल्त, २८.८.८३

## एकला असून मी

एकला असून मी नसे कधीच एकला
बद्ध वाटलो तरी सदैव आत मोकळा

जाग आणिती स्वरे गुणी पहाट पाखरे
वायु सांगतो कळ्यांस गूज काही लाजरे

डोकवे गजांमधून ऊन सोनजावळी
भूप गात ये सकाळ पारिजात पाउली

अंगणी तृणे खुडीत गाय संथ वावरे
वत्स बागडे तिचे न वायुलाहि आवरे

राहतो फुलांमुलांत पाखरांत नेहमी
आणि अक्षरांचिया रसप्रसन्न उद्गमी

सांजताच, चित्रभानु अंबरा चितारितो
तो पहात मी मुकाट रानवाट चालतो

आत्ममग्न वा प्रसन्न वृक्ष जीव लाविती
कृष्ण झावळांमधून चंद्र येइ सोबती

आढळे घरातही उरातलेच चांदणे
एकलेपणी न मी कधीच सोबतीविणे

पर्वरी - आल्त, ३.९.८३

## ओढ

का मला तुझीच ओढ या वयातही
योजने असून दूर साथ प्रत्यही
देह बंधनी असून जीव मोकळा
ऐकतो तुझा सुरेल कोवळा गळा
कष्टताहि गे तुझाच स्पंद जाणवे
त्यातुनी उरी नवाच छंद पालवे
कालभेद स्थानभेद लोपले सखे
तू नि मी परस्परांत लीन सारखे
तू प्रसन्न मी निमग्न आत्मसंगमी
आज़ आपुली अपूर्व रंगपंचमी

पर्वरी - आल्त, १५.११.८३

## धटिंगण

धटिंगण पावसाने बाई उच्छाद मांडिला
माझा फुलांचा शृंगार ओली चिखली सांडला

कसे फिरावे माघारी होता तिष्ठत सहेला
मला साधायाची होती सांज साजणाची वेळा

वेड्या वाऱ्याच्या वेगाने धावले मी ओलेत्याने
बावळ्यांच्या विळख्यात मला झेलियले त्याने

शुद्ध येता पाहिले मी माथा नौरंगी तोरण
सांडलेले होते पायी पैंजणे होऊन.

१९८३

## गेल्या तीस वर्षांत

गेल्या तीस वर्षांत
आपल्या किती मैफली
रंगल्या असतील या गच्चीवर !
मस्त बिलोरी चांदण्यात
आणि मिट्टकाळोखातही
नक्षत्रांच्या छत्रीखाली
या व्हिस्कीपेक्षाही
त्या कवितेची नशा
किती तरी भारी होती !

किती सहज कविता लिहीत होतो आपण !
एकदा तर एकाच दिवशी
इथेच मी पाच कविता
लिहिल्या होत्या, गायल्या होत्या.
तो तेव्हाचा माझा तरुण स्वर
वाटते कंप पावतो आहे
अनंत अवकाशात
बोलत बोलत आपण जागवल्या रात्री
उभारीत संकल्प आणि आदर्श
आजच्या या इमारतींहूनही उंच
इथेच लावले आपण व्यथांचे अर्थ
आपल्या आणि जगांच्याही

इंद्रियांच्या सगळ्याच चवी ताज्या होत्या
रांधल्या जाणाऱ्या सुक्या मटणाचा
मिरमिरणारा गंध
नाकाच्या शेंड्याला गोंजारून जात होता
प्रवास खडतर होता
पण पावले कशी झपझप पडत होती!
आज ददात उरली नाही
यश पायाशी मोटली करून
मुकाट पडून आहे
विमानातून जाता
माडांचे टाकळे व्हावे
तसे या जुन्या संकल्पांचे
आणि आदर्शांचे झाले आहे
पण आपण वाढलो
हे काय थोडे झाले?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६०१
दा. क्र. २४४५७
काव्य २५०।९२।८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

आता कविता सुचत नाही
सुचली तर तिच्यात
ती तेव्हांची नशा नसते
पण एक गोष्ट
तेव्हा ध्यानी आली नव्हती
ही कबुतरे – कदाचित ह्यांची वडिलधारी
तेव्हाही अशीच घुटुर घू
करीत होती प्रीतीच्या कंसात
पण आज, त्यांचे ते हितगुज
आपले ध्यान खेचून घेते
ते सारखे ऐकत रहाण्यात
केवढे समाधान आकंठ, निरत?

१९८३

## देव नाही दूर

देव नाही दूर  तुझ्यातच आहे
सांडुनिया ताठा  ओणवून पाहे

दुधी दही लोणी  लोणियात घृत
तशी वाट पाहे  तुझी भगवंत

लावी विरजण  आले दही चाळ
लोणियाच्या तळी  ठेव थोडा जाळ

तेव्हा तुझ्याहून  देव ना निराळा
किती तुला देऊ  संतांचा निर्वाळा ?

पर्वरी - आल्त, ७.१.८४

## तुझे मन

तुझे मन तुझे मन
निळे निरभ्र आकाश
तुझे मन तुझे मन
सौम्य शुक्राचा प्रकाश

तुझे मन गार गाढ
कुळागरातली तळी
उदासीच्या एकांतात
पितो ओंजळी ओंजळी

तुझे मन नेणे माझ्या
किती जन्मांचे संचित
कालपर्यंत राहिले
कसे गडे अचुंबित

तुझे मन मनराणी !
माझ्या आनंदाचे धन
कधी कधी तेच पण
येते आसवे घेऊन !

पर्वरी - आल्त, ११.२.८४

## कशी आलीस घेऊन

कशी आलीस घेऊन तेच तेव्हाचे तारुण्य
आणि कारुण्यी न्हालेले नवे आगळे लावण्य ?

तुझा अजूनही ताजा तोच पूर्वीचा जिव्हाळा
नव्या प्रत्येक विभ्रमी जुना उसवतो वाळा

विश्वासाने हातावर तुझा विसावला हात
फुलारला धन्यतेने रोमांचांचा पारिजात

किती नियती शहाणी दोघे वेळीच पांगलो
आणि उराउरी आता चोख होऊन भेटलो

तुझ्या सुखासवी गडे माझा ओला झाला खांदा
चार ओठांनी जोडिला दोन प्राक्तनांचा सांधा

पर्वरी - आल्त, १५.२.८४

## आशीर्वाद

अमल निरागस प्रेमळ सालस सुंदर शुभलक्षणी
गमसी मज तू गत जन्मीची लेकच माझी गुणी
किति लवकर तू जीव लाविला मधुर वागण्यातुनी
खचित तुझ्यावर भाळुनि जाइल गुणी नरनागर कुणी

नको पाडसा, गत शल्याचे दुःख उगाळित बसू
तुझेच प्राक्तन म्हणेल तुज ' ये, आता खेळू हसू.'
जीवन आहे मंगल सुंदर आनंदाची खनी
हसत रहा तू हसेल तेव्हा कवेत तुज घेउनी

सुखसंसारी ऐस कुठेही गोंजारित अंबुजे
थांब पाडसा ! मला घेउ दे मस्तक हुंगुनि तुझे

पर्वरी - आल्त, १६.२.८४

## नको आणूस आरशी

नको आणूस आरशी
माझा पाणोठाच भला
त्यात सूर्यबिंबापरी
माझा तळपतो टिळा

नको करू वेणी फणी
वाट पाहे माझा धनी
तोच बांधील कुंतल
लांब कोवळ्या बोटांनी

तेथे सोनल सुरंगी
लालचुटुक अबोली
माझ्या माळील वेणीत
फुलहौशी वनमाळी

नको चंदन कस्तुरी
त्याच्या मिठीमाजी दोन्ही
माझ्या राजाच्या ओठांत
गंध गुलाबाचे पाणी

सार बाजूला तो साज
देह फुलांहून ताजा
गडे कालच मी न्हाले
ऋतू फलद्रूप माझा

पर्वरी - आल्त, १.३.८४

## डाळिंबीची दोन फुले

डाळिंबीची दोन फुले एकमेकांना शिवली
तुझ्या माझ्या जिवणींची भेट मला आठवली
फांदी हालली जराशी थेंब दवाचे सांडले
खांदी माझ्या तुझे डोळे होते असे ओसंडले
आली सुगंधी झुळूक अंग लपेटून गेली
तुझ्या शीतल स्पर्शाच्या पुन्हा पालवल्या वेली
खूप सांगायचे होते बोल गोठले कंठात
माझ्या श्रध्देची आंगठी तुझ्या बैसली बोटात
बोटे बोटांत गुंतली होती तेथेच थांबली
वाढणाऱ्या उन्हातही चांदण्याने ओथंबली

पणजी, ७.३.८४

## गीत तुझे गाता गाता

गीत तुझे गाता गाता
मीच गीत झालो
प्रीत तुझी ध्याता ध्याता
मीच प्रीत झालो

रूप तुझे स्मरता स्मरता
चांदण्यात न्हालो
नाम तुझे जपता जपता
मी तुलाच प्यालो

लागलो न भोगांमागे
वा तयांस भ्यालो
हाक जागृतीची येता
त्यांतुनी निघालो

असा धुंद गोसावी मी :
ना कुणा कळालो
तरी तुझ्या ज्योतिःस्पर्शा
भाळलो मिळालो

ऐस तू खुशाल कुठेही
मी तुडुंब धालो
अविश्रांत हिंडुनि अंती
मी निवांत झालो

पर्वरी - आल्त, ११.३.८४

## सकाळच्या उन्हात

मी सकाळच्या उन्हात फूलसा विकासतो
अन् दुपारच्या वनात सावलीत बैसतो
सांजवेळच्या तटी समुद्रनृत्य पाहतो
मध्यरात्र होइतोहि चांदण्यात नाहतो

वाहतो उधाणुनी अनादि नाद लाहतो
संतसंगतीतसा विमुक्तचित्त राहतो
प्रश्न लोपती तिथेच मी असा विसावतो
मी मलाच विस्मरून अंतरी रसावतो

पर्वरी - आल्त, ११.३.८४

## तमःस्तोत्र

ॐ नमः श्री भगवन् तमा
प्रकाशजनका पुरुषोत्तमा
तुझिया महिम्या नाही सीमा
उपमा शब्द सर्व थिटे
बापा तुझिया ओटी पोटी
तारामंडले असंख्य कोटी
ज्योतिष्कमळे अति चोखटी
गोमटी लावण्य भांडारे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६२०
दा. क. २४४५१
काव्य २५०१७ ओक
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

त्यांचीच जी आदिम ज्योती
अमृत नामे बोलती श्रुती
ती तू पेरून गर्भस्थिती
निवान्ती मज जोजविले
तिजमुळेच उघडिता डोळे
त्यांनी कवळिले ब्रह्मांड सगळे
राहिले जे त्याहि वेगळे
तेहि पाहिले अंतर्दृष्टी
अति पाहून शिणता दिठी
तूच त्यांते लाविली ताटी
निजकणवेची घालून मिठी
शीण शेवटी वारिले
ऐसा तू गा दातारू
निजानंदाचे आवारू
मृत्यु होऊनि माझा भारू
सारोद्धारू वाहिलासी
आता दृष्टी जाहली क्षीण
म्हणुनी तुझिया चरणी लीन
आलिंगोनी मज नवीन
सुवर्ण दृष्टी दे बापा
जे जे काही पाहीन नवे
ते ते सर्व गाईन भावे
प्रसाद मानून तुझ्याच नावे
सर्वात्मभावे समर्पीन.

REFBK-0024451
REFBK-0024451

पुणे, २४.४.८४